# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४/604
दिनांक :२९/१०/२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपुर.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक व त्यांचे कृती कार्यक्रमाबाबत...**

**संदर्भ :** १. आपले कार्या.पत्र जा.क्र.नियमन/ड वर्ग निवडणुक/कृती आराखडा/१६६८५/१४ दि.१०/१०/२०१४
२. आपले कार्या. पत्र जा.क्र.जिउनिना/ नियमन/ निवडणुक/ड वर्ग संस्था/१६९८६/१४ दि.२८/१०/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भ क्र.१ अन्वये आपण नागपुर जिल्ह्यातील 'ड' वर्गामधील दि. ३१/०३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण २८ सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे. मात्र प्रस्तावासोबतच्या उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर शहर -२ यांचे प्रपत्रामध्ये २२ संस्थांच्या कृती कार्यक्रमास मान्यता मिळणेस विनंती केलेली असुन सदर प्रपत्रामध्ये अ.क्र. १६ नंतर अ.क्र.१७ न घेता अ.क्र.१८ घेण्यात आल्याने संस्थांची संख्या २२ आलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात २१ संस्थांचा कृती कार्यक्रम सादर केल्याचे दिसुन येते. त्यामुळे संपुर्ण नागपुर जिल्ह्याचा विचार करता नागपुर शहर -२ मधील वर नमुद केल्याप्रमाणे **२१ संस्था**, नागपुर शहर-१ मधील **१ संस्था**, कामठी तालुक्यातील **३ संस्था**, रामटेक तालुक्यातील **१ संस्था** व उमरेड तालुक्यातील **१ संस्था** अशा **एकुण २७ संस्थांचा** प्रस्ताव मंजुरीस्तव सादर केल्याचे दिसुन येते.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये आपण प्रस्तावात नमुद असलेल्या वरील प्रमाणे २७ संस्थापैकी २४ संस्थांचा ई-१ नमुना सादर केलेला असुन त्यामध्ये उपनिबंधक शहर-२ यांचेकडील उक्त प्रमाणे २१ संस्थांपैकी **१**. नागपुर धान्य बाजार गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **२**. श्रीसेवा गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **३**.दि को-ऑप. होलसेल मार्केट कम क्लॉथ मार्केट हौसिंग सोसा लि. नागपुर, **४**. नागपुर सराफ बाजार गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **५**.७२ LIC वकीलपेठ गाळेधारकांची सह.संस्था म. नागपुर, **६**.चंद्रलोक गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **७**.आशाकिरण गृहनिर्माण सह.संस्था म.नागपुर, **८**.निसर्ग गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **९**.प्रार्थना गृहनिर्माण सह.संस्था म.नागपुर या संस्था अवसायनात गेलेल्या असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे उपनिबंधक शहर-२ यांचेकडील वरीलप्रमाणे २१ संस्थांपैकी अवसायनातील ९ संस्था वगळता १२ संस्था निवडणुकीस पात्र असल्याचे दिसुन येते. **त्यामुळे नागपुर जिल्ह्यातील एकुण २७ संस्थांपैकी १८ संस्था निवडणुकीस पात्र असल्याचे निदर्शनास येते.**

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन उपरोक्तपणे नमुद केलेनुसार आपल्या जिल्ह्यातील दि.३१/३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण १८ संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक (दोन्ही दिवस वगळता)यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.

२. संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचा दिनांक १/११/२०१४ नंतरचा असावा.

३. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.

४. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.

५. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.

६. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

**सोबत :** परिशिष्ट अ

30/10/14

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

# परिशिष्ट अ

## राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४ दि.२७/१०/२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट

| अ. क्र. | जिल्हा | तालुक्याचे नाव | संस्थेचे नाव | विशेष साधारण सभेचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | नागपुर | नागपुर शहर - २ | लक्ष्मी कर्मचारी को.ऑप. हौसिंग सो. | श्री.पी.एस.पुरके, स.स.अधि. |
| २ | | | फिरदोष गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर | श्री.एस.जे. पुराम, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| ३ | | | मेडिकल डिपार्टमेंट एम्प्लॉईज को. ऑप. हौसिंग | श्री. एस.टी. डोनाडफर, सहकार अधि. श्रेणी-२ |
| ४ | | | महाविर को. ऑप. हौसिंग सोसा. लि. नागपुर | श्री. एस.टी. डोनाडफर, सहकार अधि. श्रेणी-२ |
| ५ | | | सिध्दीविनायक को.ऑप. हौसिंग सोसा.लि. नागपुर | श्री.आर. डी. मुन, सहकार अधि. श्रेणी-२ |
| ६ | | | २०, MIG सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर | श्री. आर.बी. शेरजे, सहकार अधि. श्रेणी-२ |
| ७ | | | रजत प्लाझा गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर | सौ.एस.एस.गावंडे, स.स.अधि. |
| ८ | | | सेंट्रल रेल्वे मजुर सहकारी संस्था म. नागपुर | श्री.एस.जे. पुराम, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| ९ | | | विकास मजुर सहकारी संस्था म. नागपुर | श्री.एस.जे. पुराम, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| १० | | | एकता मजुर सहकारी संस्था म. नागपुर | श्री. ए.एस. कस्तुरे, सहायक सहकार अधिकारी |
| ११ | | | सिरसपेठ मजुर सहकारी संस्था म. नागपुर | श्री. ए.एस. कस्तुरे, सहायक सहकार अधिकारी |
| १२ | | | हरिकृपा मजुर सहकारी संस्था म. नागपुर | श्री. एन.एस.भालेराव, सहायक सहकार अधिकारी |
| १३ | | नागपुर शहर -१ | जिवनछाया गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर | श्री. सी.ए. बोदड, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| १४ | | कामठी | मदनी गृहनिर्माण सहकारी संस्था कामठी | श्री. अंकुश सहारे, सहायक सहकारी अधिकारी |
| १५ | | | किसान मजुर सहकारी संस्था येरखेडा | सौ.सुकेशिनी गजभिये, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| १६ | | | लक्ष्मी मजुर सहकारी संस्था कामठी | सौ.सुकेशिनी गजभिये, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| १७ | | रामटेक | नगरपरिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था म. रामटेक | श्री. व्ही.एम. काटोले, सहकारी अधिकारी श्रेणी-२ |
| १८ | | उमरेड | श्री.संत गजानन गृहतारण सहकारी संस्था म. उमरेड | श्री. अतुल वानखेडे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |

(डॉ. आनंद जोगदंड) ३०/१०/१४

सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./पुर्तता/२०१४/६८३

दिनांक २८/१०/२०१४

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

तथा जिल्हा उपनिबंधक,

सहकारी संस्था, नागपुर.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीबाबतच्या प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करणे बाबत..**

**संदर्भ :** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर यांचे जा.क्र.नियमन/ड वर्ग निवडणुक/कृती आराखडा/१६६८५/१४ दि.१०/१०/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भीय प्रस्तावाव्दारे आपण नागपुर जिल्ह्यातील 'ड' वर्गामधील दि. ३१/०३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण २८ सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे.

मात्र सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत :

१. प्रस्तावाच्या केवळ कव्हरींग लेटरवर आपली स्वाक्षरी असुन सोबत जोडलेल्या प्रपत्रावर आपली स्वाक्षरी नाही.
२. प्रस्तावासोबतच्या उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर शहर -२ यांचे प्रपत्रामध्ये २२ संस्थांच्या कृती कार्यक्रमास मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे. मात्र प्रपत्रामध्ये अ.क्र. १६ नंतर अ.क्र.१७ न घेता अ.क्र.१८ घेण्यात आल्याने संस्थांची संख्या २२ आलेली आहे. मात्र प्रत्यक्षात पडताळणी केली असता २१ संस्थांचा कृती कार्यक्रम सादर केल्याचे दिसुन येते. त्यामुळे संपुर्ण नागपुर जिल्ह्याचा विचार करता नागपुर शहर -२ मधील वर नमुद केल्याप्रमाणे **२१ संस्था,** नागपुर शहर-१ मधील **१ संस्था,** कामठी तालुक्यातील **३ संस्था,** रामटेक तालुक्यातील **१ संस्था** व उमरेड तालुक्यातील **१ संस्था** अशा **एकुण २७ संस्थांचा** प्रस्ताव मंजुरीस्तव सादर केल्याचे दिसुन येते.
३. सादर केलेल्या प्रस्तावात नमुद असलेल्या २७ संस्थांपैकी २४ संस्थांचा ई-१ नमुना सादर केलेला असुन त्यामध्ये उपनिबंधक शहर-२ यांचेकडील उक्त प्रमाणे २१ संस्थांपैकी **१.** नागपुर धान्य बाजार गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **२.** श्रीसेवा गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **३.**दि को-ऑप. होलसेल मार्केट कम क्लॉथ मार्केट हौसिंग सोसा लि. नागपुर, **४.** नागपुर सराफ बाजार गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **५.**७२ LIC वकीलपेठ गाळेधारकांची सह.संस्था म. नागपुर, **६.**चंद्रलोक गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **७.**आशाकिरण गृहनिर्माण सह.संस्था म.नागपुर, **८.**निसर्ग गृहनिर्माण सहकारी संस्था म. नागपुर, **९.**प्रार्थना गृहनिर्माण सह.संस्था म.नागपुर या संस्थां अवसायनात गेलेल्या असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे उपनिबंधक शहर-२ यांचेकडील वरीलप्रमाणे २१ पैकी अवसायनातील ९ संस्था वगळता १२ संस्था निवडणुकीस पात्र असल्याचे दिसुन येते. **त्यामुळे नागपुर जिल्ह्यातील एकुण २७ संस्थांपैकी १८ संस्था निवडणुकीस पात्र असल्याचे निदर्शनास येते.** या निवडणुकीस पात्र असलेल्या १८ संस्थांपैकी १६ संस्थांची ई-१ नमुन्यातील माहिती सादर केलेली आहे. सबब निवडणुकीस पात्र असणाऱ्या सर्व संस्थांची ई-१ नमुन्यातील माहिती पुन:श्च सादर करावी.
४. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा ई-२ नमुना व प्रमाणपत्र तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यांचे दप्तरी असल्याचे नमुद केलेले नाही.

५. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांची मतदार यादीचा कायदा कानु व मंजुर उपविधीनुसार छाननी करुन खातरजमा केल्याचा उल्लेख नाही.

६. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांपैकी रामटेक तालुक्यातील १ संस्था वगळता उर्वरीत तालुक्यातील संस्थांचा कार्यक्रम हा ऑक्टोबर २०१४ या महिन्यात चालु केल्याचे दिसुन येते. तसेच उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर शहर २ यांच्या कृती कार्यक्रमामध्ये नमुद केलेल्या सर्व रकान्यातील दिनांकामध्ये विसंगती दिसुन येते.

७. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांपैकी रामटेक तालुक्यातील १ संस्था वगळता उर्वरीत संस्थांच्या प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असल्याचे दिसुन येत नाही.

८. उक्त प्राधिकृत अधिकारी यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना अवगत केलेल्या आहे किंवा नाही याबाबत नमुद केलेले नाही.

**तरी वरील सर्व बाबींची पुर्तता करुन तसे केल्याचा पुर्तता अहवाल या प्राधिकरणास २ दिवसात सादर करण्यात यावा.**

सदरचे निर्देश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(डॉ. आनंद जोगदंड)** 30/10/14
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी